शिक्षण परिषदेमध्ये दिव्यांग विद्यार्थ्यांचे प्रवर्गानुसार शिक्षकांना ओळख झाली. त्याबद्दल जनजागृती झाली. शिक्षकांच्या असणाऱ्या अडचणी व १ ते १० शिक्षणपरिषदा झाल्या. त्यामध्ये वेगवेगळे विषय अध्यापन पद्धती व त्यांच्या प्रवर्गानुसार अध्ययन शैली याबद्दल शिक्षकांना माहिती झाली.

*** समग्र शिक्षणामधील येणाऱ्या योजना –** मदतनिस भत्ता, प्रवास भत्ता, प्रोत्साहन भत्ता, दिव्यांग प्रमाणपत्र कसे काढाय–चे याबद्दल माहिती झाली, दिव्यांग विद्यार्थ्याचे मूल्यमापन कसे करायचे यांचे पीपीटीद्वारे मार्गदर्शन केले. जेणेकरून शिक्षकांना मूल्यमापन करतांना अडचण येणार नाही.

*** मला आवडलेली शिक्षण परिषद –** आश्रम शाळा काळखेडा येथे इंग्रजी भाषा या विषयावर श्री. सचिन सोनवणे, सर जि.प. शाळा, बाळापूर इ. २ री भाषा इंग्रजी पाठाची सुरुवात पूर्वानुभवावर आधारित व ज्ञानावर आधारित प्रश्न विचारून करण्यात आली. चार्टवर दिलेल्या सूचना आधी विद्यार्थ्यांना माहीत होत्या. त्या विद्यार्थ्यांनी वाचून दाखविल्या. नविन सूचना शिक्षकांनी विद्यार्थ्यांना वाचून दाखविल्या. त्याचा अर्थ विद्यार्थ्यांना समजला की नाही. प्रात्यक्षिक होऊन पडताळण्यात आले. उदा. Open the door ही शब्दपट्टी एका विद्यार्थ्याकडून वाचून दाखविल्या नंतर विद्यार्थ्यांने Class चा दरवाजा उघडला असे अनेक वाक्य इंग्रजीतून वाचून दाखवून विद्यार्थ्यांनी कृतीतून करून दाखविले.

---

## ४. श्रीमती ज्योती विक्रम चव्हाण, प्राथमिक शिक्षिका, जि.प. शाळा, मोराणे (प्र.ल.), ता.जि. धुळे.

**इयत्ता :** १ ली व २ री **विषय :** खेळू, करू, शिकू **उपघटक :** मानवी मनोरे

आपणा सर्वांना माहितच आहे की, आरोग्य व शारीरिक शिक्षण, कार्यानुभव आणि कला शिक्षण ह्या तीनही विषयांना अनुक्रमे खेळू, करू, शिकू या नावाने पाठ्यपुस्तकात गुंफले आहे. दि.३१/१/२०२३ रोजी शिक्षण परिषदेत मानवी मनोरे ह्या विषयावर माझ्या वर्गातील विद्यार्थ्यांनी संगीताच्या तालावर एक एक कृती आधी समजून घेऊन मग त्यात काही स्वत:च्या कल्पना मांडून कृतीचे सादरीकरण करून दाखविले.

माझ्या दैनंदिन अध्ययन–अध्यापन प्रक्रियेत विद्यार्थ्यांचे लक्ष या उपक्रमातून मी टिकवून ठेवले आहे. तसेच या उपक्रमातून भाषा, गणित आणि परिसर अभ्यास या विषयाची देखील सांगड घालता येते. मधल्या सुट्टीच्या वेळेत देखील वर्गातील मुले स्वत:च्या कल्पनेचा वापर करून मनोरे तयार करीत असतात.

माझ्या केंद्रातील सर्व शिक्षकांना या उपक्रमाचा उपयोग त्यांच्या शाळेत नक्कीच होणार आहे. तसेच दैनंदिन अध्ययन अध्यापन प्रक्रियेत विद्यार्थ्यांचे अवधान टिकवून ठेवण्यासाठी देखील हा उपक्रम अतिशय उपयुक्त आहे. केंद्रातील प्रत्येक शाळेतील शिक्षक संगिताच्या तालावर विविध स्व कल्पनांचा वापर करून मानवी मनोरे विद्यार्थ्यांकडून करून घेत आहे. यामुळे विद्यार्थ्यांचा विश्वास, आनंद, द्विगुणीत होण्यास फार मदत होत आहे.

# ५. महानगरपालिका, धुळे - समावेशित तज्ज्ञ व विशेष शिक्षक

## विषय : अध्ययन शैली

**प्रस्तावना :**

दिव्यांग मूल कसं शिकेल याबाबत सामान्य शिक्षकांना पडलेला प्रश्न त्यांना भेडसावणाऱ्या समस्या यांचे निराकरण कसे करता येईल. यावर प्रत्येक शिक्षकाला मात करता यावी व विशेष मूल सामान्य मुलांप्रमाणे शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात येण्यासाठी शिक्षकाने देखील आपली भूमिका यशस्वीरीत्या पार पाडावी या उद्देशाने माहे ऑगस्ट २०२२ या वर्षातील शिक्षणपरिषदेत अध्ययनशैली या विषयाचा समावेश करण्यात आला.

**उद्दिष्टे :** १) सर्वसामान्य मुलांमध्ये दिव्यांग मुलांचे समायोजन करणे

२) सामान्य शिक्षकांना दिव्यांगांची अध्ययन शैली लक्षात घेऊन त्यानुसार अध्ययन करण्यास मदत होईल.

३) शैलीनुसार दिव्यांग विद्यार्थ्यांना करतांना विशिष्ट शैक्षणिक साधनांचा वापर करणे.

४) विद्यार्थ्यांच्या प्रवर्गानुसार त्याची अध्ययनशैली लक्षात घेऊन त्यांचा सर्वांगीण विकास घडवून आणणे.

**आव्हाने : १) दृश्यशैलीतील विद्यार्थ्यांना येणारी आव्हाने –**

या शैलीतील विद्यार्थी सर्वसामान्य विद्यार्थ्यांप्रमाणे पाचही ज्ञानेंद्रियांचा उपयोग न करता इतर चार ज्ञानेंद्रियांचा उपयोग करतो त्या चारपैकी जास्तीत जास्त डोळ्यांचा उपयोग करून दृश्य स्वरूपात शिकू शकतो. त्यावेळी सर्वसामान्य शिक्षकांना अध्ययन-अध्यापन करताना सर्व संकल्पना कशा स्पष्ट कराव्यात. याबाबतीत आव्हाने येतात.

**२) श्राव्य शैलीतील विद्यार्थ्यांना येणारी आव्हाने –**

श्राव्य शैलीतील विद्यार्थ्यांना अध्ययन अध्यापन करताना शिक्षकांना आव्हाने येतात.

**३) बहुअध्ययन शैलीतील विद्यार्थ्यांना येणारी आव्हाने–**

बहुअध्ययन शैलीतील विद्यार्थी नेमका कसा ओळखावा हे मोठे आव्हान शिक्षकांसमोर उभे राहते. हे विद्यार्थी सर्व ज्ञानेंद्रियांचा उपयोग करून शिकत असले तरी त्यांची सर्व ज्ञानेंद्रिय सक्रीय असतातच असे नव्हे. तो कसा शिकेल या संदर्भात शिक्षकांसमोर आव्हाने उभी राहतात.

**मार्गदर्शन –**

पूर्वीच्या शिक्षणपरिषदेत २१ दिव्यांग प्रवर्गाची ओळख करून देण्यात आली होती. त्याच पूर्वज्ञानावर आधारित दिव्यांगाच्या २१ प्रकारांची पुन्हा उजळणी करून त्या त्या प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी कोणती अध्ययन शैली लागू होते, हे आधी समजावून सांगितले.

उदा. १) कर्णबधीर प्रवर्ग : दृश्य अध्ययन शैली, २) दृष्टीदोष प्रवर्ग : श्राव्य अध्ययन शैली

३) स्पर्श अध्ययन शैली, ४) MR, MD, CP, ASD, LD : बहुअध्ययन शैली.

वरील सर्व अध्ययन शैलीच्या विद्यार्थ्यांना त्याच्या शैलीनुसार कसे अध्ययन-अध्यापन करावे याचे सविस्तर मार्गदर्शन केले.

**परिणामकारकता**

तासिकेत केलेले मार्गदर्शन शिक्षकांनी समजून घेतले व त्यांना पडलेले प्रश्न देखील त्याठिकाणी विचारून त्याचे निरसन करून घेतले तसेच त्या विषयासंदर्भातील PPT व्हॉटसॲप ग्रुपला सेंड करण्यात आल्या. वेळोवेळी शाळाभेट दरम्यान असे निदर्शनास आले की, शिक्षक विद्यार्थ्यांचा प्रवर्ग ओळखून अध्ययन शैलीनुसार व गरजेनुसार शिकतात व काही अडचण आल्यास विशेष शिक्षकांचे मार्गदर्शन घेतात. धन्यवाद

# ६. महानगरपालिका, धुळे - समावेशित तज्ज्ञ व विशेष शिक्षक

## १६ ऑक्टोंबर २०१८ चा शासन निर्णय– दिव्यांग विद्यार्थ्यांचे मूल्यमापन

**प्रस्तावना**

शिक्षण परिषदेतील विषय हे सामान्य शिक्षकांना दिव्यांग विद्यार्थ्यांबाबत येणाऱ्या आव्हानांवर उपाययोजना म्हणून समुपदेशन करण्यात आले. यातील प्रमुख विषय म्हणजेच दिव्यांग विद्यार्थ्यांचे मूल्यमापन कसे करावे याबाबत शिक्षकांना आव्हाने असल्याने मूल्यमापन हा विषय आहे. हा विषय माहे जानेवारी २०२३ मध्ये घेण्यात आला.

**वर्ग शिक्षकांची आव्हाने**

१) दिव्यांग विद्यार्थ्यांचे मूल्यमापन हे फक्त विशेष शिक्षकांमार्फतच झाले पाहिजे अशी सामान्य शिक्षकांची धारणा होती.

२) दिव्यांग विद्यार्थ्यांची प्रश्नपत्रिका तयार करून प्रगतीपत्रक व गुणदान हे विशेष शिक्षकांनी तयार करावे

३) अभ्यासक्रमाबाबत देखील अनेक आव्हाने येत होती.

शिक्षण परिषदेत करण्यात आलेले मार्गदर्शन प्रथमत: शिक्षकांना दिव्यांग मूल प्रवेशानंतर संकलित व आकारीत मूल्यमापन कसे करावे याबाबत वर्ग शिक्षक समजून घेतले. तसेच यात प्रामुख्याने संकलित म्हणजे प्रथमसत्र व द्वितीय सत्राअखेर केलेले मूल्यमापन, आकरिक म्हणजे एखादा घटक शिकवतांनाच्या वेळेस त्याला अनुसरून केलेले मूल्यमापन हे शिक्षकांना समजले.

मूल वर्गात आल्यावर त्याची क्षमता व गरज लक्षात घेऊन कोणती साधनतंत्रे वापरावीत याबाबत शिक्षकांना समजले व पटले. अध्ययन व अध्यापन करतेवेळी अगदी सहज साधनतंत्राचा वापर कसा करता येईल व तो कसा करावा हे समजले.

उदा. मूल कर्णबधीर असेल तर सामान्य शिक्षकांना येणारे आव्हाने कोणते?

तर त्याला ऐकू येत नाही. परंतु तो बघू शकतो व चित्र दाखविल्यास तो हावभावाद्वारे कृती करू शकतो. म्हणजेच त्याचा प्रतिसाद निरीक्षण व कृती या साधन तंत्रातून सहजपणे साध्य होतो. हे शिक्षकांना समजले.

अशाप्रकारे सामान्य शिक्षकांना दिव्यांग विद्यार्थ्यांचे मूल्यमापन करतांना त्यांचा प्रवर्ग लक्षात घेऊन योग्य त्या साधनतंत्राचा वापर करून मूल शिकू शकतो हे सामान्य शिक्षकांना पटले. सामान्य शिक्षकांनी दिव्यांग विद्यार्थ्यांच्या समस्या जाणून घेतल्या. त्यानुसार प्रत्येक मूल शिकू शकते. त्यांच्या अध्ययन शैलीनुसार शिक्षकांना अध्ययन शैली, शैलीनुसार अध्ययन अध्यापन हा विषय अगोदरच्या शिक्षण परिषदेत झालेला असल्याकारणाने शिक्षकांच्या संकल्पना स्पष्ट होत्याच त्यामुळे फारशा अडचणी आल्या नाहीत.

अध्ययन शैलीची जोड मूल्यमापनास दिल्यामुळे शिक्षकांना हा विषय समजण्यास फारशा अडचणी आल्या नाहीत.

**परिणामकारकता:**

शिक्षण परिषदेत १६ ऑक्टोबर २०१८ चा शासन निर्णयान्वये परिषदेबाबत दिव्यांगांना मिळणाऱ्या सोयी सवलती व मूल्यमापना–चे निकष समजावून दिल्यानंतर शासन निर्णयाची प्रत शाळेवर देण्यात आली.

विशेष म्हणजे शिक्षण परिषदेच्या माध्यमातून सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापन हा विषय शिक्षकांपर्यंत सर्वत्र पोहचविण्यात आला. एप्रिलमध्ये घेण्यात आलेल्या परिषदेत दिव्यांग विद्यार्थ्यांच्या प्रश्नपत्रिकेपासून तर परीक्षेपर्यंत सामान्य शिक्षकांना फारसे आव्हाने आली नाहीत व पेपर तपासणी नंतर गुणदान देणे कामी शिक्षकांनी सहकार्य केले.

अशाप्रकारे शिक्षण परिषदेतील समावेशित शिक्षणांतर्गत घेण्यात आलेले विषय अनुरुप असून सामान्य शिक्षकांना दिव्यांग विद्यार्थ्यांची गुणवत्ता ही सामान्य विद्यार्थ्यांप्रमाणे नक्कीच उंचावता येतेय. ह्यात समाधान दिसून येते.धन्यवाद.

## ७. श्री. महेंद्र पवार, विषय साधनव्यक्ती, महानगरपालिका, धुळे.

I am Mahendra Pawar, subject Expert, M.N.P. Dhule. We have 20 M.N.P. Schools. There are 8 Marathi and 12 Urdu Medium Schools. We have 95 teachers in total. We take two shikshan parishadas separately for Marathi and Urdu medium schools. We have 95 teachers in total. We take two shikshan parishadas separaterly for Marathi and Urdu medium teachers. All these shikshan parishadas were very useful and helpful for teachers. They were thought provoking. Many discussions and dialogues were held during the parishadas.

In the academic year 2022-23, the District Institute of Education and Training (DIET) Dhule had made radical changes in conducting shikshan parishadas. Now all the shikshan parishadas are conducted on the specific date and time throughout the district. All kinds a felicitation ceremoneis and lunches were prohibited. PPTs for. the given subjects were provided. There was separate period for DIVYANG so that all the teachers may know about it.

We were always curious to know what would be the subject of this month shiksan parishad because every month has a new subject, a new vision, If we look at the subject of each months parishad, you will come to know the variety a subjects like National Education Policy (NEP) 2020 NIPUN BHARAT, foundational Literacy and Numeracy (FLN), Bridge Course (Setu Abhyaskram), Vidyapravesh, Shala Purva Tayari, the reports a ASAR, NAS were discussed among the teachers.

Among all these subjects what I like is the lessons to be taken in Shikshan Parishad. Specifically the subjects taken were of the subjects like Marathi, Maths and English.

The shikshan parishad which I cherished must is a December where the subject English was taught and different methods and styles were discussed. During the parishad of Urdu medium the teacher Mr.Sharif was teaching- how to teach wards and their pronunciation. He taught the subject by giving various examples. He taught the words and their Urdu meanings the even collaborated the English pronunciation with that a Urdu. Then the whole class got actively involved in the discussion of pronunciation of words. Every teacher has given their opinion about it and clarified their point a view by giving different examples. The educational discussion was held during the parishad. Knowingly or unknowing their classroom practices. were discussed. The discussion was very fruitful and helpful for the teachers.

That day the actual time for shikshan parishad was over. But still the teachers were discussing about the topic and nobody was ready to go home early. Here lies the success of shikshan parishand.

# ८. धुळे तालुका - विषय साधनव्यक्ती, समावेशित तज्ज्ञ व विशेष शिक्षक

महाराष्ट्र शासनाने निर्देशित केलेल्या मार्गदर्शक सूचनांनुसार दरमहा केंद्रस्तरावर शिक्षण परिषद घ्यावी. त्यानुसार जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था धुळे मार्फत दरमहा विषय ठरवून दिले जातात. तसेच शिक्षण परिषदेसाठी विषयनिहाय पीपीटी दिल्या जातात. त्यानुसार २८ जून २०२२ या दिवशी मुकटी बीटातील मुकटी केंद्रात जि.प. केंद्रशाळा मुकटी येथे शिक्षण परिषदेचे आयोजन करण्यात आले. धुळे जिल्ह्यातील प्रत्येक शिक्षण परिषदेत जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, धुळे येथून मा. डायट प्राचार्य, जेष्ठ अधिव्याख्याता, अधिव्याख्याता, विषय साधनव्यक्ती, समावेशित साधनव्यक्ती तसेच विशेष शिक्षक ठराविक विषयाबाबत मार्गदर्शन करत असतात.

जूनमध्ये घेण्यात आलेल्या शिक्षण परिषदेत मुख्य विषय हा पायाभूत साक्षरता व संख्याज्ञान ओळख यात FLN ची जिल्हास्तरीय सुकाणू समिती, पायाभूत साक्षरता व संख्याज्ञान जिल्हा प्रकल्प सनियंत्रण कक्ष माहिती याचे बरोबरच शाळापूर्व तयारी, अध्ययन सद्यस्थिती, NAS-2021 दिव्यांगांचे २१ प्रकार तसेच केंद्रातील शैक्षणिक गरजांविषयीही चर्चा करण्यात आली. या सर्व विषयांचे विवरण थोडक्यात पुढीलप्रमाणे देत आहोत.

**१) शाळापूर्व तयारी PPT सादरीकरण :**

सदर तासिका जि.प. केंद्रशाळा मुकटी येथील उपक्रमशील शिक्षिका श्रीमती स्मिता शिवाजी पाटील यांनी घेतली. त्यांना विषय साधनव्यक्ती श्रीमती माधवी देसले यांनी सहकार्य केले. यात विद्याप्रवेश या पुस्तिकेतील विविध कृती प्रत्यक्ष कृती करून दाखविण्यात आल्या. यांचा उपयोग केंद्रातील प्रत्येक शाळेतील शिक्षकांनी त्यांच्या गावातील मातांच्या प्रत्यक्ष सहवासाने करून घेतल्या. या परिषदेनंतर काही कालावधीतच आयडीया कार्ड, शाळेचे पहिले पाऊल कृतिपुस्तिका, त्यातील विविध कृतींचा सराव शाळेतील शिक्षकांनी माता-पालकांकडून करवून घेतल्याने विद्यार्थ्यांमध्ये सकारात्मक बदल दिसून आले. तसेच विद्यार्थ्यांचे गुणवत्तेत वाढ दिसून आली.

**२) पायाभूत साक्षरता व संख्याज्ञान ओळख**

२७ ऑक्टोबर २०२१ च्या पायाभूत साक्षरता व संख्याज्ञान महाराष्ट्र शासन निर्णय राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० नुसार इ. १ ली ते ३ रीच्या विद्यार्थ्यांना २०२६-२७ पर्यंत भाषिक कौशल्ये व गणितीय कौशल्ये तसेच आनंदी व्यक्तिमत्त्वाची ओळख व समावेशित शिक्षण या विषयांवर सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. सदर तासिकेचे उत्कृष्ट सादरीकरण जि.प. शाळा अंबोडे येथील उपशिक्षिका श्रीमती नयना बुरकुले यांनी केले. यात जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, धुळे यांनी दिलेल्या मार्गदर्शक PPT चे उत्कृष्ट सादरीकरण करण्यात आले. याचा उपयोग प्रत्येक शाळेतील शिक्षकांना प्रत्यक्ष अध्ययन अध्यापनात झाला.

**३) अध्ययन सद्यस्थिती**

सदर तासिका जि.प. शाळा आंबोडे येथील तंत्रस्नेही शिक्षक श्री. राकेश केदार यांनी घेतली. यात केंद्रातील अध्ययन सद्यस्थितीचे विश्लेषण करून मौखिक भाषा व गणितीय संख्याज्ञान या विषयावर कृतिकार्यक्रम राबविणेबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. तसेच अभ्यासात मागे असलेल्या विद्यार्थ्यांना विशेष उपचारात्मक वर्ग घेवून गुणवत्तावाढीसाठी करण्यात येणाऱ्या प्रयत्नांबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली.

**४) NAS -2021 राष्ट्रीय संपादणूक सर्वेक्षण**

२०२१ नुसार जिल्ह्याची सद्यस्थितीबाबत PPT द्वारे सादरीकरण श्रीमती माधवी देसले व श्री. राकेश केदार यांनी केले. यात इ. ३ री व इ.५वी या वर्गांचे भाषा व गणित विषयातील विद्यार्थ्यांची संपादणूक पातळी वाढविण्यासाठी राज्यस्तरीय सर्वेक्षण व जिल्हास्तरीय सर्वेक्षण अभ्यासण्यात आले. त्यानुसार आपण सर्व शिक्षकानी आपल्या जिल्ह्यातील, तालुक्यातील व केंद्रातील संपादणूक पातळी वाढविणेसाठी विशेष प्रयत्न करणेबाबत चर्चा घडवून आली. तसेच भाषा व गणित विषयाची गुणवत्ता वाढविणेबाबत मार्गदर्शन करण्यात आले. NAS सर्वेक्षणात ज्या अध्यापन निष्पत्तीत विद्यार्थी मागे पडतात त्यांचे विविध उपक्रमांद्वारे गुणवत्ता वाढ करणेबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

**५) दिव्यांगांचे २१ प्रकार**

समावेशित शिक्षक उपक्रमांतर्गत, दिव्यांग विद्यार्थ्यांचे विविध २१ प्रकार, त्यांची लक्षणे, वैशिष्ट्य त्यांना शिक्षणात येणारी आव्हाने यांच्या माहितीचे सादरीकरण विशेष शिक्षिका श्रीमती पल्लवी मालोकर यांनी जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, धुळे यांचेमार्फत देण्यात आलेल्या PPT द्वारे करण्यात आले. याचा उपयोग केंद्रातील शिक्षकांना दिव्यांग विद्यार्थ्यांच्या अध्यापनासाठी झाला.

**६) शैक्षणिक गरजांविषयी चर्चा**

सदर तासिकेचे सादरीकरण केंद्रप्रमुख श्री. अशोक देसले यांनी केले. यात विविध शासकीय परिपत्रके, शैक्षणिक विषयांवर चर्चा करण्यात आली.

यानंतर श्री. विठ्ठल घुगे, शिक्षण विस्तार अधिकारी यांनी मुकटी केंद्रातील प्रत्यक्ष व सद्यस्थिती, विविध गरजा व प्रत्यक्ष करावयाची (गुणवत्ता वाढीसाठी) कार्यवाही याबाबत अतिशय सुंदर व शिस्तबद्ध मार्गदर्शन केले.

याप्रमाणे शिक्षण परिषदेत विविध शैक्षणिक विषयांवर संपूर्ण माहितीचे आदानप्रदान झाले व आनंदी वातावरणात शिक्षण परिषद पार पडली.

---

## ९. श्री. महेश भामरे, विशेष शिक्षक केंद्र– नाडसे, ता. साक्री, जि.धुळे

**१) घटक**

बीट कासारे, केंद्र नाडसे, जि.प.शाळा छाईल, श्रीमती रत्नमाला देवरे यांनी सप्टेंबर महिन्यांची शिक्षण परिषदेत पायाभूत साक्षरता व संख्याज्ञान गणित विषयात स्थानिक किंमत (एकक, दशक, शतक) यांची ओळख ज्ञानरचनानुसार विद्यार्थ्यांसोबत एकक, दशक, शतक नावाच्या टोप्या देवून अंकांच्या समूहातून निवड करून ओळख करून दिली. विद्यार्थ्यांना चांगल्याप्रकारे स्थानिक किंमत कळाली.

**२) विषयाबाबत मत**

विद्यार्थ्यांना स्थानिक किंमत कळण्यासाठी योग्य साधनांचा, कृतींचा उपयोग करण्यात आला. प्रत्यक्ष कृतीद्वारे, अभिनय करून एकक, दशक, शतक कळण्यास सोपे झाले. खेळाच्या माध्यमाने विद्यार्थ्यांनी स्थानिक किंमत कशी ओळखायची? याबाबत उत्कृष्ट मार्गदर्शन केले. केंद्रातील इतर शिक्षकांना त्या पाठाबाबत प्रेरणा मिळाली.

**३) कार्यक्षेत्रात झालेला उपयोग**

केंद्रातील प्रत्येक शाळेत, वर्गात या उत्कृष्ट परिपाठाचे अनुकरण करून वर्गातील विद्यार्थ्यांना स्थानिक किंमत (एकक, दशक,

शतक) यांच्या टोप्या देवून अंकाच्या समूहातून अंक निवडून प्रत्येक विद्यार्थी कोणत्या स्थानिक किंमतीच्या गटात येतात. यानुसार खेळातून संपूर्ण किंमत विद्यार्थ्यांना अध्ययन-अध्यापन करण्यात आले.

**४) मला आवडलेली शिक्षण परिषद**

२९/९/२०२३ या दिवशी श्रीमती रत्नमाला देवरे मॅडम यांनी स्वयंप्रेरणेने उत्स्फूर्त सहभाग घेऊन विद्यार्थ्यांसोबत चांगला परिपाठ घेतला. पायाभूत साक्षरता व संख्याज्ञान यावर गुणवत्तेच्या दृष्टिकोनातून परिपाठ झाला व सर्व शिक्षकांनी परिपाठाची प्रेरणा घेतली. वर्गाची गुणवत्ता, ज्ञानरचनावाद, विद्यार्थी सहभाग या घटकांचा समावेश करण्यात आला.

**५) यापेक्षा वेगळेपण**

नाडसे केंद्रांतर्गत दिव्यांग विद्यार्थ्यांना समावेशित वर्गामध्ये कशाप्रकारे अध्ययन -अध्यापन करायचे? याबाबत पीपीटीच्या साहाय्याने मार्गदर्शन करण्यात आले.

परिपाठाच्या वेळेस TLM, अभ्यासक्रमातील घटकांची निवड व अध्यापन पद्धतींचा उपयोग कसा केला जातो याबाबत सखोल मार्गदर्शन करण्यात आले.

---

## १०. श्री. गोरखनाथ पी. कानडे, विशेष शिक्षक, केंद्र : कासारे, ता. साक्री

**घटक :** केंद्र : कासारे जि.प. प्राथमिक शाळा मालपूर येथील इयत्ता ३ री च्या विद्यार्थ्यांना ३ अंकी इंग्रजी संख्यांचे वाचन करायला शिकविणे.

पायाभूत संख्याज्ञान साक्षरता व संख्याज्ञान हा उपक्रमाचा विचार करून प्रत्येक विद्यार्थ्यांची गुणवत्ता कशी वाढेल, हा दृष्टिकोन ठेवून इयत्ता ३ रीच्या विद्यार्थ्यांना ३ अंकी इंग्रजी संख्याचे वाचन शिकवितांना प्रथम वर्गरचना ही अर्धगोलाकार केली. प्रत्येक विद्यार्थी हा शिक्षिकेला दिसत होता. अध्यापनाची सुरुवात करण्याअगोदर ३ अंकी संख्याचे इंग्रजी वाचनाचे महत्त्व व गरज काय? हे पटवून दिले.

प्रथम विद्यार्थ्यांना थेअरी सांगून प्रात्यक्षिक करून दाखविले. नंतर प्रत्येक विद्यार्थ्याला वैयक्तिक लक्ष देवून वाचन करून घेतले. नंतर सराव करून घेतला. योग्य उत्तराच्या वेळी छान, शाब्बास, (Very Good) प्रोत्साहनाचा वेळोवेळी वापर केला.

३ अंकी इंग्रजी संख्यांचे वाचन हे कौशल्य अध्यापन करतांना शिक्षिकेने योग्य तंत्रे व योग्या अध्यापनाच्या टप्प्याचा वापर केला. कौशल्य हे प्रत्येक विद्यार्थ्यांच्या बौद्धिक क्षमतेला अनुसरून निवडले होते.

केंद्रातील इतर शाळेतील शिक्षकांनी प्रथम प्रात्यक्षिक बघितले, नंतर अध्यापनाचे टप्पे, प्रोत्साहन वगैरे सर्व डोळ्यांनी पाहिल्यामुळे त्यांनी त्यांच्या शाळेवर ह्याच पद्धतीने तंत्रे, टप्पे, पद्धती, प्रोत्साहन वगैरे यांचा वापर करून अध्यापन केले. त्यावेळी विद्यार्थ्यांचा प्रतिसाद चांगला होता.

तसेच मी स्वत: माझ्या दिव्यांग बालकांना ३ अंकी इंग्रजी संख्याचे वाचन हे कौशल्य बीट कासारे, जि.प. कोकले येथील शाळेत अध्ययन अध्यापन केले. भविष्यात माझ्या कार्यक्षेत्रात ज्या शाळांना भेटी देऊन अध्ययन अध्यापनाचा स्वत: अनुभव देऊन.

मला आवडलेली शिक्षण परिषद ही सप्टेंबर २०२२ ची जि.प. शाळा मालपूर येथील होती. शिक्षण परिषद योग्य वेळी सुरू होऊन सर्व तासिका वेळेवर व पूर्ण घेण्यात आल्या. शिक्षण परिषदेत शिक्षकांचा सहभाग हा सक्रिय होता.

धन्यवाद.

## ११. श्रीमती ज्योती वसंत मंगळे, विषय साधनव्यक्ती, गट साधन, ता. साक्री.

**शाळा –** जि.प. शाळा सुरुपान

**घटक –** केंद्र घोडदे, जि. प. शाळा सुरपान येथील श्रीमती रुपाली सुरेश पवार यांनी इ. २ री च्या वर्गातील मुलांना इंग्रजी (व्याकरण). (एकवचन/अनेकवचन) Singular plural

माहे–डिसेंबर महिन्याच्या शिक्षण परिषदेच्या इंग्रजी विषयांचे प्रभावी पाठ सादरीकरण

घटक–व्याकरण – Singular plural एकवचन/अनेकवचन

विद्यार्थ्यांना इंग्रजी भाषेतील गोडी व आवड निर्माण करण्यासाठी विद्यार्थ्यांना एकवचन/अनेकवचन यातील इंग्रजी मधील व्याकरणाचा भाग घेतला. एकवचन व अनेकवचन यातील संबोध स्पष्ट करून इंग्रजीमधून संभाषण केले व ज्ञानरचनावाद नुसार विद्यार्थ्यांकडून त्या क्रिया करून घटक समजावण्यात आला व विद्यार्थ्यांकडून इंग्रजी मधून संभाषण करून व्याकरणातील संबोध स्पष्ट केले.

शिक्षकांनी त्या पाठाचे अनुकरण केले व त्या पाठांची प्रेरणा घेतली. अशाप्रकारे इंग्रजी भाषा ही मातृभाषा सारखी विद्यार्थी इंग्रजीमधील शब्द संभाषण करण्याचा प्रयत्न करत होती. अशाप्रकारे पाठ उत्कृष्ट झाला.

**⁕ विषयाबाबतचे मत –** इंग्रजी विषय हा विद्यार्थ्यांना अवघड वाटत होता. परंतु अध्ययन अध्यापन प्रक्रिया सुलभ असल्या–कारणाने इंग्रजी एकवचन/अनेकवचन हा घटक विद्यार्थ्यांना समावेश करून घेतल्यामुळे सोपा वाटू लागला व इंग्रजी विषयाची आवड निर्माण झाली.

**⁕ कार्यक्षेत्रात झालेला उपयोग –** केंद्रातील प्रत्येक शाळेत या उत्कृष्ट पाठाचे प्रत्येक शिक्षकांनी आपल्या वर्गात जाऊन इंग्रजी अनेकवचन/एकवचनच्या माध्यमातून व ज्ञानवादनुसार केंद्रातील प्रत्येक शाळेमध्ये या पाठाचा उपक्रम राबवण्यात आला.

**⁕ मला आवडलेली शिक्षण परिषद –** २९/१२/२०२३ या दिवशी श्रीमती रुपाली सुरेश पवार मॅडम यांनी स्वयंप्रेरणेने उत्स्फूर्त सहभाग घेवून विद्यार्थ्यांसोबत चांगला परिपाठ घेतला व इंग्रजी विषयाचा उत्कृष्ट पाठ घेतला. ह्या पाठामुळे शिक्षकांनी प्रेरणा घेतली. इंग्रजी विषयाची गोडी व आवड निर्माण झाली. वर्गाची गुणवत्ता ज्ञानरचनावाद विद्यार्थी सहभाग या घटकाचा समावेश करण्यात आला.



## १२. श्रीमती अन्सारी खालीदाबानो हसन इकबाल, विषय साधनव्यक्ती , गटसाधन केंद्र, साक्री )

**१) घटक –** बीट शेवाळी, जि.प. केंद्र शाळा शेवाळी येथील श्रीमती प्रतिभा साळुंके मॅडम यांनी विषय गणित इ.३ री पायाभूत साक्षरता व संख्याज्ञान अंतर्गत एकक/दशक/शतक गणित विषयी पाठ घेतले. गणित विषयासंबंधी संबोध स्पष्ट करण्यासाठी दैनंदिनीतील साहित्याचा वापर, तसेच गणित पेटीच्या साहित्याचा वापर करून घटक स्पष्ट केले. त्यामुळे विद्यार्थी प्रतिसाद चांगला मिळाला. गणितीय संबोध स्पष्ट करून विद्यार्थ्यांना एकक/दशक/शतक समजवले.

**२) विषयांबाबत मत –** ज्ञानरचनावाद विद्यार्थ्यांचा समावेश करून तीन विद्यार्थ्यांच्या साहाय्याने चांगल्या प्रकारे संबोध स्पष्ट केले. प्रत्यक्ष विद्यार्थी कृती करून संबोध स्पष्ट केले.

**३) कार्यक्षेत्रात झालेला उपयोग –** केंद्रातील सर्व शिक्षक त्यांच्या वर्ग अध्यापनात चांगल्याप्रकारे शैक्षणिक साहित्य व गणित पेटीच्या साहाय्याने उपयोग करतात.

**४) मला आवडलेली बाब –** सोप्या व साध्या भाषेत विद्यार्थ्यांना संबोध स्पष्ट केले गेले. गणित विषयात विद्यार्थ्यांना गोडी निर्माण झाली.

**५) यापेक्षा वेगळेपणा –** शेवाळी केंद्रात दिव्यांग विद्यार्थ्यांसोबत सामान्य विद्यार्थ्यांचा समावेश करून त्यांना अध्यापन प्रक्रिया P.P.T. द्वारे समुपदेशन दिले.

*** घटक –** बीट शेवाळी केंद्र जि.प. शाळा भामेर - सी.एस. सोनवणे सर यांनी डिसेंबर २०२२ इ. ४ थी विषय इंग्रजी Devloping Construction Skill. . या विषयावर पाठ घेतले. विद्यार्थ्यांना इंग्रजी विषयाची गोडी लागेल यासाठी एक व्हिडीओ दाखविले. विद्यार्थ्यांमध्ये इंग्रजी विषयात आत्मविश्वास वाढेल. शाळेचे वातावरणात ज्या वस्तू होत्या त्याच्या साहाय्याने इंग्रजी शब्द तयार करून विद्यार्थ्यांनी चांगल्याप्रकारे संभाषण केले. नंतर विद्यार्थ्यांनी छोटे छोटे संवाद व संभाषण आत्मविश्वासाने केले.

*** विषयाचे मत –** ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांचा बोली भाषा वेगळी असून इंग्रजी विषय अवघड वाटतो. परंतु जर आपण दररोज विद्यार्थ्यांशी इंग्रजीत संवाद साधला तर विद्यार्थी इंग्रजी संभाषण करू शकतो. इंग्रजी पेटीचा वापर करून चांगल्याप्रकारे विद्यार्थ्यांचे Skill Devloped होऊ शकते.

*** कार्यक्षेत्रात झालेला उपयोग –** केंद्रातील सर्व शिक्षकांशी परिपाठात इंग्रजी संभाषण कौशल्यासाठी उपकृत केले. तसेच विद्यार्थ्यांमध्ये इंग्रजी विषयाची गोडी निर्माण होईल.

*** मला आवडलेली बाब –** डिसेंबर २०२२ मध्ये इंग्रजी विषयाबाबत मार्गदर्शन केले गेले. इंग्रजी विषयाबाबत विद्यार्थी तसेच शिक्षकांमध्ये जागृकता निर्माण झाली.

*** यापेक्षा वेगळेपणा –** उर्दू माध्यमाच्या शाळेत FLN बाबत उर्दू भाषेत मार्गदर्शन व समुपदेशन.

## १३. गट साधन केंद्र, शिरपूर – सर्व विषय साधनव्यक्ती, समावेशित तज्ज्ञ व विशेष शिक्षक

**अ) मला आवडलेली बाब/घटक :**

१) DIET कार्यालयामार्फत शिक्षण परिषदेसाठी मिळालेले नियोजन अत्यंत सुलभ असते. यात विविध P.P.T. (विषयनुसार) दिल्या जातात. या P.P.T. द्वारे केलेले सादरीकरण हे प्रभावी ठरते. P.P.T. मुळे शिक्षकांची एकाग्रता वाढीस लागून घटक समजण्यास मदत होते. P.P.T. मध्ये असलेले फोटो/तक्ते/व्हिडिओ याद्वारे घटक प्रभावी होऊन शाळा स्तरावर विद्यार्थ्यांसाठी उपक्रम राबविण्यास मार्गदर्शन मिळते.

२) शिक्षण परिषदेत प्रत्येकाला तासिका वाटप नियोजन दिले असल्याने पूर्व तयारीस पुरेसा वेळ मिळून सादरीकरणाची संधी मिळते. शिक्षकांना तासिका घेण्याची संधी मिळाल्याने त्यांचे विषयज्ञान समृद्ध होऊन प्रेरणा मिळते.

३) आदर्श पाठाच्या सादरीकरणादरम्यान प्रत्यक्ष विद्यार्थी सहभाग घेतला जातो. यामुळे प्रत्यक्ष वर्गातील पाठाची अनुभुती इतर शिक्षकांना मिळते. यामुळे विद्यार्थ्यांना त्यांच्या गरजेनुरुप व विविध साहित्य आणि अध्यापन पद्धतीचा वापर करण्याविषयी मार्गदर्शन मिळते.

**ब) विषयासंदर्भात मत**

**१) शाळापूर्व तयारी अभियान /पहिले पाऊल/विद्याप्रवेश**

इ. १ लीत दाखल झालेल्या विद्यार्थ्यांसाठी पहिले पाऊल माता गटांमार्फत बालकांची तयारी करून घेण्यात आली. मूल प्रत्यक्ष शाळेत दाखल झाल्यावर विद्याप्रवेश कार्यक्रम घेण्यात येतो.

शिक्षण परिषदेत विद्याप्रवेश कार्यक्रमाचे मार्गदर्शन विद्यार्थी कृतिपुस्तिका व शिक्षक मार्गदर्शिकेचा वापर करून देण्यात आल्याने उपक्रम राबविण्यास सुलभ झाले.

**२) ज्ञानरचनावाद आदर्श पाठ सादरीकरण**

**अ) संबाळे, ता. शिरपूर येथील** शिक्षण परिषदेत श्री. जयसिंग जतनसिंग राजपूत या शिक्षकांनी इंग्रजी विषयाचा ज्ञानरचनावाद आधारित इंग्रजी विषयाचा आदर्शपाठ घेतला. Listen & follow the Instruction L.S.R.W.आधारित इंग्रजी भाषा कौशल्याचे, उद्बोधन केले. विविध उपक्रम घेतले. प्रत्यक्ष इतर शिक्षकांना सहभागी करून घेतल्याने घटक प्रभावी झाला. केंद्रातील विद्यार्थ्यांना लाभ मिळाला.

**ब) श्री. संदेश हजारे (जि.प. शाळा साकवद)**

इंग्रजी विषयाची तासिका P.P.T. सह Listen & Read या घटकावर सविस्तर तासिका घेऊन सादरीकरण केले. या घटकांमुळे Listen & Read या Activities घेऊन अध्ययन निष्पत्ती साध्य होण्यास मदत झाली.

**क) तंत्रस्नेही तासिका**

Read to me App दीक्षा App चा वापर प्रत्यक्ष Demo दिल्याने शिक्षकांच्या शंका दूर होऊन वापर करण्याचे समजले. विद्यार्थी स्वत: दीक्षा App मधील Scanner चा वापर करून पाठ्यपुस्तकातील QR Code Scan करतात व व्हिडिओ/P.P.T. बघतात. यामुळे विद्यार्थ्यांना घटक समजण्यास मदत घेऊन आनंद मिळतो.

**ड) NAS /SLABS**

P.P.T. द्वारे जिल्ह्याची सद्यस्थिती समजून घेण्यास मदत मिळाली. ज्या अध्ययन निष्पत्तीमध्ये जिल्हा मागे आहे. त्या विषय व इयत्ता निहाय अध्ययन निष्पत्ती साध्य करण्यासाठी दिशा मिळाली. कृति आधारित उपक्रम घेण्यासाठी शिक्षकांना मार्गदर्शन मिळाले.

**इ) गणित व भाषा आदर्शपाठ**

गणित पेटी व भाषा पेटीतील साहित्याचा वापर करून शिक्षकांनी तासिका घेतल्याने साहित्याचा योग्य वापर करणे समजले. तसेच अध्ययन निष्पत्ती साध्य करण्यासाठी व घटक समजण्यासाठी पेटीचे महत्त्व समजले.

**फ) खेळ– मानवी मनोरे**

शिक्षकांनी विद्यार्थ्यांकडून मानवी मनोरे कृति व सराव करून घेतला. यामध्ये विविध शारीरिक हालचाली घेऊन कसरतीचे प्रात्यक्षिक दाखविण्यात आले. विद्यार्थ्यांचा शारीरिक व्यायाम झाला. तसेच शिक्षकांनी स्वकल्पनेतून मुलांना रंगीबेरंगी कपडे घालून विविध प्रकारचे रंगीत मनोरे तयार केले. मुलींनी आपल्या परिधान केलेल्या फ्रॉकच्या साहाय्याने कमलफुले, सूर्यफूल यांचा आकर्षक मनोरा तयार केला. सदर मनारे हे जि.प.शाळा भावेर (केंद्र होळनांथे) श्री. गिरिश गागुंर्डे यांनी मार्गदर्शन व तयारी करून घेतली होती.

**ग) कागदकाम व प्रथमोपचार पेटी**

प्राथमिक आरोग्य केंद्रातील श्री.डॉ. संदीप पाटील यांनी प्रथमोपचार पेटीतील वस्तुंचे प्रात्यक्षिक दाखवून त्याचा वापर समजवला. काही दुर्घटना झाल्यास कशा पद्धतीने प्रथमोपचार करावा याचे ज्ञान मिळाले.

कागदकाम प्रत्यक्ष विद्यार्थ्यांना व शिक्षकांना यांच्याकडून विविध वस्तू बनवून घेतल्याचा आनंद मिळाला. विविध कृती करून घेतल्या.

**⁕ दिव्यांग तासिका**

दरमहा शिक्षण परिषदेमार्फत केंद्रातील उमर्दा, कोडीद, अर्थे, न.प. जातोड इ. RPWD Act नुसार २१ प्रकारच्या दिव्यांगांना ३ ते १८ वयोगटातील सर्व सेवा सुविधा, शैक्षणिक सहकार्य, प्राथमिक, माध्यमिक विशेष शिक्षक इ. मार्फत दिव्यांगांच्या अध्ययन शैलीनुसार चर्चा, मदत प्रचार–प्रसार होतो.

सेवा सुविधा मदत सहकार्यामुळे दिव्यांग मुलांचा प्रतिसाद उत्तम लाभतो. शाळा प्रवेश उपस्थिती, दरमहा चांगली लाभते. अंगणवाडी ते १२ वी पर्यंतच्या CWSN, HBC, $E_1$, $E_2$ इतर समस्याग्रस्त, कोरोनाबाधित मुलांनां लाभ मिळतो. जून २०२२ ते मार्च २०२३ विशेष शिक्षक व विषयतज्ञ इत्यादीमार्फत सेवासुविधा, मदत, प्रचार–प्रसार सुरू आहे.



## १४. श्री. राहूल जिजाबराव पाटील, विशेष शिक्षक, केंद्र होळनांथे, शिरपूर.

**१) शिक्षण परिषदेचा विषय**

दिव्यांग विद्यार्थी आणि अध्ययन अध्यापन प्रक्रिया

**२) उद्देश**

समावेशित शिक्षणात सामान्य विद्यार्थ्यांबरोबर दिव्यांग विद्यार्थ्यांचे अध्ययन-अध्यापन सुलभपणे व्हावे.

**३) मला आवडलेली बाब/घटक**

समावेशित शिक्षणात सामान्य विद्यार्थ्यांसोबतच दिव्यांग विद्यार्थ्यांनाही शिक्षणाची समान संधी मिळावी यासाठी शिक्षण परिषदेत प्रत्येक महिन्याला समावेशित शिक्षणासंदर्भात विषय घेण्यात आले. सर्वसाधारणपणे प्रत्येक शाळेत सरासरी किमान २ ते ५ दिव्यांग विद्यार्थी असतात. या सर्व विद्यार्थ्यांचे शिक्षण थांबू नये म्हणून जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेद्वारे शिक्षण परिषदांमध्ये दिव्यांग विद्यार्थ्यांच्या शिक्षणासंदर्भात विषयांची सखोलपणे मांडणी होत आहे. ही बाब मला विशेषत्वाने सुखावून गेली.

**४) विषयासंदर्भात मत**

RPWD कायदा २०१६ व R.T.E.कायदा २००९ अन्वये दिव्यांग विद्यार्थ्यांनाही सामान्य शाळेत सामान्य विद्यार्थ्यांसोबत मूलभूत शिक्षणाचा अधिकार आहे. ही बाब या विषयाच्या माध्यमातून तालुक्यातील सर्व शिक्षकांपर्यंत पोहोचल्यामुळे सर्व दिव्यांग विद्यार्थ्यांच्या शिक्षणाचा मार्ग सुलभ झाल्याचे चित्र तालुक्यात दिसून येत आहे.

**५) माझ्या कार्यक्षेत्रात झालेला उपयोग**

दिव्यांग विद्यार्थ्यांच्या अध्ययन-अध्यापनात येणाऱ्या अडचणींसदर्भात विशेष शिक्षक म्हणून केंद्रात भेटी देतांना जि. प. शाळा होळ येथे इ. १ली मध्ये बौद्धिक अक्षमता असणारा विद्यार्थी दाखल झाला होता. सदर विद्यार्थ्याच्या अध्ययन-अध्यापनात मला विशेष अनुभव आला तो पुढीलप्रमाणे मांडत आहे.

**६) वैयक्तिक माहिती**

विद्यार्थ्याचे नाव - कु. रत्नेश जगदीश महाले, इ. १ ली. दिव्यांग प्रकार - बौद्धिक अक्षमता (डाऊन सिंड्रोम)

प्रमाण - ६०%, शाळा -जि.प. शाळा, होळ, केंद्र- होळनांथे वर्गशिक्षक - श्रीमती मनिषा पाटील

**७) विद्यार्थ्यांची पूर्वस्थिती**

वर्गातून पळून गावात हिंडणे, इतर मुलांना मारहाण करणे, एका जागेवर फार वेळ न बसणे, शिक्षणात कोणताही रस नसणे, या प्रकारच्या तक्रारी रत्नेशच्या बाबतीत वर्गशिक्षकांना जाणवत होत्या.

**८) केलेल्या उपाययोजना**

रत्नेश वर्गात जास्त वेळ बसावा यासाठी त्याच्या आवडणाऱ्या बाबी करण्यास त्याला प्रोत्साहन मिळावे यासाठी प्रयत्न केले. त्याला भूमिकाभिनय करण्याची आवड होती. जसे की, ड्रायव्हर सारखी गाडी चालवण्याचा अभिनय, कंडक्टरसारखे तिकीट देणे, दुकानदारासारखी पैसे व वस्तूंची देवाण-घेवाणीचा अभिनय करणे. अशा गोष्टींची त्याला आवड होती. म्हणून विशेष शिक्षकांच्या मदतीने वर्गशिक्षकांनी त्याला त्याच वर्गात व्यासपीठावर अभिनय करण्यासाठी प्रोत्साहन देवू लागलो. हे सतत केल्यामुळे त्याचे शाळेत येण्याचे प्रमाण वाढले.

**९) फलनिष्पत्ती**

वर्गातील इतर विद्यार्थी बोर्डवरील १ ते १०० अंकांचे वाचन करत असत. हळूहळू रत्नेशच्या मनावर याचा सकारात्मक परिणाम

होवून तो देखील, १ ते १०० अंक वाचायचा प्रयत्न करू लागला. काही कालावधीनंतर सततच्या सरावाने रत्नेश सर्व अंकांचे तोंडी वाचन करू लागला.

वर्गात सतत खोड्या करणारा रत्नेश आज यशस्वीपणे अध्यापनात रस दाखवत आहे. इ. १ लीच्या अध्ययन निष्पत्तींच्या मानाने त्याचे हे यश नेत्रदिपक आहे. जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेद्वारे शिक्षण परिषदांच्या माध्यमातून दर्जेदार व उपयुक्त विषयांची PPT द्वारे मांडणी केल्यामुळेच सदर फलनिष्पत्ती अनेक शाळांमध्ये दिसून येत आहे.

---

## १५. श्रीमती पल्लवी बाबुलाल मांडोळे, प्राथमिक शिक्षिका, जि.प. शाळा काळखेडा, केंद्र फागणे, ता.जि.धुळे.

**स्थळ** : जि.प.शाळा नकाणे, केंद्र-फागणे **दिनांक :** १२/१०/२०२२

पायाभूत साक्षरता व संख्याज्ञान शिक्षण पर्व अंतर्गत नाविन्यपूर्ण उपक्रम अध्ययन-अध्यापन प्रक्रिया पाठ

**विषय** : गणित **उपघटक :** बेरीज संकल्पना समजावणे **इयत्ता** : १ ली

सर्व प्रथम एक, अनेक या पूर्वानुभवावर आधारित विद्यार्थ्यांना अंक कार्ड व वेगवेगळ्या वस्तू हाताळण्यास देण्यात आल्या. विद्यार्थी प्रत्येकी एक कार्ड घेवून कार्डवर जो अंक आहे तेवढ्या वस्तू उचलण्यास सांगण्यात आले. यामुळे स्वत: विद्यार्थी हाताळून अंक व वस्तू मोजून दाखवले. त्यावर आधारित प्रश्नांची उत्तरे दिली. तद्नंतर दोन-दोन विद्यार्थ्यांना समोर बोलावून त्यांच्या हा-तातील वस्तू एकत्र करण्यास सांगितले व त्या वस्तू मोजण्यास सांगितले.

जसे - पहिला विद्यार्थी तीन वस्तू दुसरा विद्यार्थी एक वस्तू दोघांच्या मिळून एकूण चार वस्तू झाल्या.

सर्व विद्यार्थ्यांनी योग्य प्रकारे वस्तू मोजल्या अशाप्रकारे विद्यार्थ्यांना वस्तू मिळवणे, एकत्र करणे, जमा करणे म्हणजेच, बेरीज करणे ही संकल्पना समजली. त्याचबरोबर विद्यार्थ्यांना बेरजेचे संख्याचिन्ह ओळख करून दिली त्यावर आधारित उदाहरणे प्रत्यक्ष वस्तूद्वारे मोजून सोडवून घेतले.

अशाप्रकारे विद्यार्थी स्व अनुभवातून अधिक -जास्त प्रमाणात त्यांची संकल्पना दृढ कशाप्रकारे होऊ शकते हे शिक्षकांना श्रीमती पल्लवी मांडोळे मॅडम यांनी समजावून सांगितले.

---



## १६. श्रीमती रत्नमाला चिंतामण देवरे, जि. प. शाळा, छाईल, ता. साक्री.

| स्थळ | महिना | विषय | विषयाचा विस्तृत तपशील |
|---|---|---|---|
| बीटस्तरीय कासारे येथे | २८/०६/२०२२ | १) शाळापूर्व तयारी | शाळापूर्व तयारी मेळावा P.P.T. च्या साहाय्याने सादरीकरण करून शिक्षकांमध्ये या संदर्भात चर्चा घडवून आणली. |
| | | २) मूलभूत साक्षरता व संख्याज्ञान | P.P.T.च्या साहाय्याने FLN च्या संदर्भात ओळख करून इयत्तानिहाय व विषयनिहाय साध्य करण्याचे उद्दिष्ट या संदर्भात मार्गदर्शन केले. इ. १ली ते ४ थी भाषा, गणित या विषयांसंदर्भात वर्षाच्या शेवटी साध्य करण्याचे उद्दिष्ट स्पष्ट केले. |
| धमनार | २८/०७/२०२२ | केंद्रातील उत्कृष्ट उपक्रम सादरीकरण | आमच्या जि.प.शाळा छाईल येथे विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता वाढीसाठी पुढील उपक्रमाचे सादरीकरण केले.<br>१) पाढे पाठांतर स्पर्धा उपक्रम<br>२) प्रश्न मंजुषा सामान्य ज्ञान<br>३) कृतियुक्त गोष्टीचे सादरीकरण<br>४) देशभक्तीवर गीत गायन<br>५) वाढदिवस साजरा करणे.<br>६) तोतोपान व श्यामची आई पुस्तकाचे वाचन अशा अनेक उपक्रमांची माहिती |
| साक्री बाबा आमटे आश्रमशाळा | ०६/०८/२०२२ | १) निपुण भारत अभियान | १) या अभियानाची गरज व महत्त्व याची पार्श्वभूमी P.P.T.च्या माध्यमातून स्पष्ट केली.<br>२) या अभियानाचे स्वरूप त्याची ध्येय्य, अध्ययन निष्पत्ती ही इयत्ता निहाय, विषय निहाय इयत्ता १ ली ते ४ थी पर्यंतचे साध्य करण्याचे अध्ययन निष्पत्ती व यात शिक्षकाची भूमिका ही मार्गदर्शकाची व सुलभकाची असेल ते स्पष्ट केले. |

| स्थळ | महिना | विषय | विषयाचा विस्तृत तपशील |
|---|---|---|---|
| | | २) पायाभूत साक्षरता व संख्याज्ञान | १) या अभियानांतर्गत मूलभूत साक्षरता व संख्याज्ञान याबाबतीत २०२६ पर्यंतचा इ. ३ रीच्या वर्गाला गाठायचे ध्येय स्पष्ट केले.<br>२) या अभियानाचा हेतू स्पष्ट करून भाषा व गणित या विषयाचे अंतिम उद्दिष्ट हे इयत्तानिहाय स्पष्ट केले. |
| | | ३) विविध भागधारकांची भूमिका | मूलभूत साक्षरता व संख्याज्ञान या बाबतीत पालकांची भूमिका काय असेल. तसेच समाजाची भूमिका याबाबत मार्गदर्शन करून स्वयंसेवी संस्थांचे सहकार्य. |
| | | ४) FLN चे मूल्यमापन | |
| | | ५) निपुण भारत प्रतिज्ञा | निपुण भारत या संदर्भात सर्व शिक्षकांना प्रतिज्ञा दिली. |
| जि.प. शाळा छाईल | २९/०९/२०२२ | इ. ३ री गणित ज्ञानरचनावाद आधारित प्रभावी पाठ सादरीकरण | इ. ३ री गणित विषयाची ९९९ पर्यंतच्या संख्यांच्या स्थानिक किंमतीचा उपयोग करून संख्यांचे वाचन व चिंतन करणे या अध्ययन निष्पत्तीवर आधारित पाठाचे सादरीकरण केले. त्यात विविध शैक्षणिक साहित्यांचा वापर केला.<br>एकक सुटे, दशक कांड्या, शतक पाटी यांचा वापर तसेच विविध खेळांच्या माध्यमातून संबोध स्पष्ट केला. |
| जि.प.केंद्र शाळा नाडसे | ११/१०/२०२२ | १) शिक्षक पर्व उपक्रम १ | १) नाविन्यपूर्ण अध्यापन शास्त्र व दिग्दर्शन पद्धती विषयी माहिती देतांना ज्ञानरचनावाद, सहाध्यायी अध्ययन अध्यापन पद्धती, स्वयंनिर्देशित पद्धती, ABL अध्यापन पद्धती, आभासी, वास्तव तंत्रज्ञान, मिश्रित शिक्षण पद्धती, पृच्छापद्धती व Flipped Classroom याविषयी सविस्तर माहिती दिली. |
| | | २) नमुना पाठाचे सादरीकरण | २) तसेच इ. ३ री मराठी या विषयावर ते अमर हुतात्मे झालेया आशय घटकावर पाठ सादर केला. |
| | | ३) शिक्षक पर्व उपक्रम -२ | ३) या उपक्रमात प्रश्नपेढी निर्मिती या विषयावर चर्चा करून प्रत्येक शिक्षकांकडून एक-एक बहुपर्यायी प्रश्नांची निर्मिती करून घेतली. वरील दोन्ही उपक्रमात PPT च्या साहाय्याने सादरीकरण केले. |

# शिक्षण परिषद.....सुंदरतेचे गोंधण

झोंबण्या उत्कृष्ठतेचा वारा
एकरूप होती ज्ञानाधारा
विचार संगमाच्या तीरावर !

वास्तवतेचे दर्शन घडण्या खरे
फुटण्या हातांना कौशल्याचे झरे
ज्ञानसंचय घडतो याच तीर्थावर !

नाविन्याचा घेऊनी ध्यास
गुणवत्तेचा धरूनी हव्यास
साहित्याची चर्चा रंगते मंचावर !

नियोजन बनते मूलनिहाय
कृती घडते साहित्यनिहाय
सदैव भर, ज्ञानरचनावादावर !

मनातल्या मिटण्या शंका
गुणवत्तेचा गुंजण्या डंका
समस्यांचे मंथन विचारसागरावर !

विषयातील विभिन्नता
कृतिकेंद्रित आशयसंपन्नता
चर्चा झडतात विश्लेषणावर !

शिक्षकांची होते संगत
परिषदेत भरते रंगत
आनंदाची लाट वर्गावर्गावर !

शिक्षणाचा घेउनी मंत्र
उपक्रमांचे अनोखे तंत्र
कृतीसमुच्चय घडतो संगमावर !

जनमाणसांचा ऐकूणी सूर
गुणवत्तेचा येण्या पूर
कृतिकार्यक्रम शाळांशाळांवर !

फुलविण्या ज्ञानफूलांची बाग
विझविण्या अज्ञानाची आग
विचार वर्षाव होतो कट्टयावर !

आयोजनातली कल्पकता
नियोजनाची व्यापकता
सुंदरतेचे गोंधण मनामनांवर !

शिक्षण परिषद...
भरविणाऱ्या हातांना प्रणाम
राबणाऱ्या करांना सलाम
ज्ञानपुष्पांचा वर्षाव पथावर !

श्री.जयप्रकाश पाटील
(वरिष्ठ अधिव्याख्याता)

# शिक्षण परिषदेचे क्षणचित्रे












